पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली
दि. १४/०८/२०१७

# वार्तापत्र

## गडचिरोली पोलीस दलातील शौर्यपुर्ण कामगीरी व खडतर सेवा बजावणा-या जवानांचा सन्मान

-o-

गडचिरोली जिहयामध्ये नक्षलग्रस्त भागात नक्षलविरोधी अभियानामध्ये शौर्यपुर्णकामगीरी बजावना-या अधिकारी व जवानांना पोलीस शौर्यपदक जाहिर झाले असुन गडचिरोली जिल्हा पोलीस दलातील १२ अधिकारी व जवानांचा यामध्ये समावेश आहे.

गडचिरोली, भंडारा, गोंदीया, चंद्रपुर या नक्षलग्रस्त भागामध्ये खडतर सेवा बजावणा-या जिल्हा पोलीस दल व एस आर पी एफ मधील २५५४ अधिकारी व जवानांना खडतर सेवेबद्यल राज्य शासनाचे खडतर सेवा पदक जाहीर झाले आहे.

गडचिरोली जिल्हयातील जंगलव्याप्त भागात आपल्या प्राणाची बाजी लावुन नक्षल्यांशी लढणा-या अधिकारी व जवानांना शौर्यपदक जाहीर करण्यात आले असुन, पोलीस शौर्य पदक प्राप्त करणा-यामध्ये शहीद-स्वरुप अमृतकर व शहीद दोघे आत्राम यांना मरणोत्तर शौर्य पदक जाहीर करण्यात आले. २२ मार्च २०१५ रोजी एटापल्ली तालुक्यातील हीक्केर येथे नक्षल्यांशी चकमक उडाली होती. या चकमकीत जिकीरीने मुकाबला करुन स्वतःच्या प्राणाचे बलिदान देणारे शहीद- स्वरुप अमृतकर व दोघे आत्राम यांना मरणोत्तर पोलीस शौर्य पदक जाहीर करण्यात आले आहे.

सध्याचे यवतमाळचे पोलीस अधिक्षक- एम. राजकुमार सर, सपोनि-नितीन माने, सपोनि -प्रफुल्ल कदम, सपोनि-विजय रत्नपारखी, पोउपनि -दत्तात्रय काळे, पोउपनि- प्रमोद भिंगारे सपोउपनि/१३३१ मोतीराम मडावी, पोहवा/१९६१ मल्लेश केडमवार, नापोशि/१६८३ जितेंद्र मारगाये, नापोशि/८३० गजेद्र सोन्जाल या अधिकारी व जवानांना पोलीस शौर्य पदक जाहीर करण्यात आले आहे. तसेच नक्षलग्रस्त भागात खडतर सेवा बजावणारे २५५४ पोलीस अधिकारी व जवानांना महाराष्ट्र शासनाचे खडतर सेवा पदक घोषित करण्यात आले आहे.

मा. डॉ. अभिनव देशमुख पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी पदक प्राप्त अधिकरी व जवानांचे कौतुक करुन आपल्या प्राणाची पर्वा न करता देशसेवेसाठी लढणा-या पदकप्राप्त अधिकारी व जवानांना अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत व भविष्यातही गडचिरोली पोलीस दल अशी उल्लेखनिय कामगिरी करेल असा विश्वास व्यक्त केला आहे.